14-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 13-05-2025 23:00 Page 1



## निवडक



**बोगमाळो : श्रीकृष्ण मंदिरात २५वे भजन सादर केल्यानंतर मोरुडकर पथकाचे कलाकार संदेश नेरुरकर, राकेश नाईक, संतोष मोरुडकर, सुयोग बापट, वासुदेव फडते, राज शिरोडकर व तुकाराम नाईक.**

### बोगमाळो येथे मोरुडकर पथकाचे श्रीकृष्ण मंदिरी २५ भजने सादर

*टीम दैनिक हेराल्ड*

**वास्को, दि. १३ :** बोगमाळो गाळींत येथील श्रीकृष्ण मंदिरात वास्को स्थित मोरुडकर भजनी पथकाने दोन वर्षात २५ भजने सादर करण्याचा सन्मान सोमवार दि. ५ मे रोजी प्राप्त केला. त्याअगोदर याच मंदिराच्या तीसऱ्या वर्धापनदिना निमित्त आपले २४ वे भजन सादर केले होते.कालच्या भजनाची सुरुवात राज शिरोडकर यानी आपल्या सुमधूर आवाजात जयजय रामकृष्ण हरीच्या गजरात केली, तर पुढे त्यानी विविध रागातील अभंग सादर केला, पुढे ज्येष्ठ कलाकार तुकाराम नाईक यानी पारंपारिक अभंग सादर केला, तसेच एकलवादन गायक कलाकार वासुदेव फडते यानी स्वत: संवादिनीसाथ करून संदेश नेरुरकर लिखीत श्रीदामोदर देव स्तुतीपर एक कोकणी अभंग सादर केला. तसेच मंदिर पुरोहित सुयोग बापट यानी सलग दोन अभंग विविध सरगम, नोटेशन, ताना, आलापी, हरकती घेत सादर करुन वातावरण भक्तिमय केले. सर्व अभंगाच्या मध्ये पथक प्रमुख संतोष मोरुडकर यानी आपल्या शैलीतील महाराष्ट्राचे गजर सादर करुन बोगमाळो परीसर दणाणून सोडला. उत्तरार्धात संतोष मोरुडकर यांनी गौळण सादर केली. पखावजसाथ संदेश नेरुरकर व स्थानिक कलाकार राकेश नाईक यानी केली. संवादिनीसाथ वासुदेव फडते यानी केली. शेवटी राज शिरोडकर यांच्या भैरवीने भजनाची गोड सांगता झाली. स्थानिक घुमट आरती कलाकारांनी आरती सादर केल्यानंतर तिर्थप्रसादाने एका यशस्वी कार्यक्रमाची सांगता झाली त्याबद्दल यजमान सुनिल केरकर यानी मोरुडकर भजनी पथकातील सर्व कलाकारांचे मनःपूर्वक आभार मानले.

---

### शांतादुर्गा नेर्लीकरीण देवस्थानात आज वर्धापनदिन

*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १३ :** वेरे बार्देस येथील श्री शांतादुर्गा नेर्लीकरीण देवस्थानात ११३ वा वर्धापनदिन बुधवार दि. १४ रोजी लविविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त सकाळी ८ वाजता देवता प्रार्थना, पुण्याहवाचन, शतकलशा अभिषेक, हवनद्वारा नवचंडी, दुपारी आरत्या, महाप्रसाद, रात्री आठ वाजता पालखी मिरवणूक, भजन, आरती, तीर्थप्रसाद व त्यानंतर ९ वाजता पितु तुजे रितू हे विनोदी नाटक सादर होईल. संजय फाळकरलिखित व गुरूदास बाळे दिग्दर्शित या नाटकाची कोरिओग्राफी सोनिया नाईक यांनी केली आहे. पार्श्वसंगीत प्रणव मालवणकर यांचे आहे.

---

### डॉ. रेखा पौडवाल यांच्या 'मनस्पर्श' कविते आज प्रकाशन

*टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १३ :** कोकण मराठी परिषद गोवा आणि इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. रेखा पौडवाल यांच्या 'मनस्पर्श' या कविता प्रकाशन सोहळा बुधवार दि. १४ रोजी संध्याकाळी ३.३० वाजता पणजी येथे आय एमएमबी सभागृहात होणार आहे. माजी केंद्रिय कायदामंत्री ॲड. रमाकांत खलप यांच्या हस्ते मनस्पर्श चे प्रकाशन करण्यात येईल. आयएमबीचे अध्यक्ष दशरथ परब कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोमप गोवाचे अध्यक्ष सागर जावडेकर उपस्थित असतील तर गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत पुस्तकावर भाष्य करतील. लेखिका चित्रा क्षीरसागर निमंत्रित पाहुण्या असतील. रेखा पौडवाल यांची कविता, कथा, ललित लेख मिळून ११ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांना महाराष्ट्र व गोव्यातील पुरस्कार लाभले आहेत.

---

### हरमल येथे आज रौद्रशंभो बालनाट्य

*टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १३ :** येथील सिद्धेश्वर संस्था व श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन,कोरकणवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने व पालये येथील नाट्य लेखक नरेंद्र नाईक लिखित, नाटय, नृत्य व संगीताने भरलेले 'रौद्रशंभो' बालनाट्य प्रयोग बुधवार दि. १४ रोजी रात्री ८ वाजता सेंट जोसेफ वाझ मल्टिपर्पज हॉल, माऊंट कार्मेल चर्च हरमल येथे होणार आहे.

या नाटकाचे दिग्दर्शन संजय मयेकर व निर्मिती प्रमुख उद्देश पेडणेकर यांनी केले आहे. छत्रपती शंभू राजांच्या जीवनावर आधारित रहस्यमय नाट्यकृती आहे. असून, या बालनाट्यात ५० मुलांचा सहभाग असून नाट्य, नृत्य व संगीताचा अंतर्भाव आहे,असे मयेकर यानी सांगितले. या नाटकाचे संगीत दिग्दर्शक दिलीप रेडकर, ओमकार नाईक, पार्श्वसंगीत द्वारकानाथ गवंडी, ध्वनि केवल सोपटे, रत्नकांत साळगावकर प्रकाशयोजना,सह दिग्दर्शन शशिकांत कोरकणकर, गजानन तारी, नृत्य दिग्दर्शिका सिद्धी गणेश नाईक आहेत.ह्या बाल नाट्यात लक्षिता तारी, श्रीराज रूद्र, अवनिष, रुही, ट्विंकल, आरोही, यतीश, ऋत्विक, स्पर्श, आरूषा कोरकणकर, अमन गोकर्णकर, रूची परब, राज खवणेकर, आर्या, शुभम,कार्तिक गावडे रूद्र ,शिवांश, आरव, पुष्कर, गार्वी, दिव्यांश, नाईक आराध्या न्हानजी, रूद्र मोंडकर, दिव्यम शिवजी, पार्थ हरमलकर,सारांश आरोलकर,सार्थक कोच्रेकर, दुर्वांक, अद्वैक दाभोलकर, संदेश गडेकर यांच्या भूमिका आहेत. तसेच इतर कलाकार श्रीशां कोरकणकर, स्वरा नाईक, हर्शिका गावडे, शोर्या तारी, हंसिका गडेकर, सहाय्यक श्वेता नागवेकर, सानिया सावळ, राजलक्ष्मी वस्ती, निर्मला शेटकर, भविता, मानसी गडेकर, ज्योत्स्ना घाटवळ आहेत. निवेदक साई म्हापणकर व श्रेयसी तळकर आहेत. तरी बाल व नाट्य रसिकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन श्री सिद्धेश्वर संस्थेचे सचिव श्वेता नाईक, खजिनदार हर्षदा गोकर्णकर व श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन संस्थेचे अध्यक्ष राजन बांधकर यांनी केले आहे.

---

### गुजरात टायटन्स आणि आरसीबीचे टेन्शन वाढले

**नवी दिल्ली, दि. १३ :** इंग्लंड क्रिकेट बोर्डाने नव्याने संघ बांधणीसाठी पुढाकार घेतला असून हॅरी ब्रूककडे सर्व फॉर्मेटची जबाबदारी दिली आहे. तसेच झिम्बाब्वे विरूद्धच्या एकमेव कसोटी, तसेच वेस्ट इंडिजविरुद्ध तीन वनडे आणि तीन टी२० सामन्यांच्या मालिकेसाठी संघ घोषित केला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताच्या निराशाजनक कामगिरीनंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने पावलं उचलली आहेत.

जोस बटलरने कर्णधारपद सोडलं आणि हॅरी ब्रूकला त्याच्या जागी धुरा सोपवली. इंग्लंड संघासाठी हॅरी ब्रूकने आयपीएल २०२५ स्पर्धेत भाग घेतला नाही. इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात वनडे मालिका २९ मे ते ३ जून दरम्यान आहे. त्यानंतर ६ जूनला टी२० मालिका सुरु होईल. १० जूनला शेवटचा सामना खेळवला जाईल. इंग्लंड आणि वेस्ट इंडिज यांच्यात २९ मे ते ३ जून दरम्यान वनडे मालिका असल्याने आयपीएलवर परिणाम होणार आहे. कारण आयपीएल खेळणाऱ्या दिग्गज खेळाडूंची इंग्लंडने संघात निवड केली आहे.

# 'आयपीएल २०२५ चे नवीन वेळापत्रक जाहीर

## सुरुवात बंगळुरू-कोलकाता सामन्याने होईल | १७ मे ते ३ जून कालावधीत होतील, एकूण १७ सामने

**मुंबई, दि. १३ :**





आयपीएल एका महिन्यासाठी स्थगित करण्यात आली होती, पण आता पुढचे सामने कधी, कुठे आणि केव्हा होणार आहेत, हे आता समोर आले आहे.

आयपीएलचे सामना आता १७ नमे पासून सुरु होणार आहेत आणि अंतिम सामना ३ जूनला होणार आहे. बीसीसीआयने आता आयपीएलचे नवीन वेळापत्रक आता जाहीर केले आहे. पाकिस्तानने गुरुवारी भारतावर हल्ला केला होता, त्यानंतर आयपीएलचा पंजाब आणि दिल्लीचा सामना सुरु होता. पण काही वेळातच हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मैदानात कोणताही गोंधळ होणार नाही, याची दखल बीसीसीआयने यावेळी घेतली आणि मोठा अपघात टाळला. त्यानंतर आयपीएल एका सामन्यासाठी स्थगित करण्यात आली होती. आता पुन्हा नव्याने आयपीएल सुरू होत आहे आणि त्याचे वेळापत्रक आता समोर आले आहे.

आयपीएल २०२५ १७ मे पासून पुन्हा सुरू होईल. लीग टप्प्यातील उर्वरित १३ सामने ६ ठिकाणी खेळवले जातील. प्लेऑफ स्टेज २९ मे पासून खेळवला जाईल आणि अंतिम सामना ३ जून रोजी होईल. बीसीसीआयने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर ही माहिती दिली. पाकिस्तानसोबतच्या तणावामुळे ९ मे रोजी आयपीएल स्थगित करावे लागले. देश सध्या युद्धाच्या स्थितीत आहे असे सांगून बीसीसीआयने स्पर्धा पुढे ढकलली होती. अशा परिस्थितीत क्रिकेट स्पर्धा आयोजित करणे योग्य नाही.

आरसीबी आणि केकेआर यांच्यातील पहिला सामना १७ मे रोजी बंगळुरूमध्ये खेळला जाईल. उर्वरित सामने जयपूर, दिल्ली, लखनऊ, मुंबई आणि अहमदाबाद येथे खेळवले जातील. लीग स्टेज २७ मे रोजी संपेल. रविवार, १८ आणि २५ मे रोजी २ डबल हेडर सामने खेळले जातील. म्हणजेच ११ दिवसांत १३ लीग स्टेज सामने होतील.

८ मे रोजी धर्मशाळा येथे होणारा पंजाब आणि दिल्ली यांच्यातील सामना पाकिस्तानच्या हल्लयांमुळे थांबवावा लागला. हा सामना आता २४ मे रोजी जयपूर येथे खेळला जाईल. प्लेऑफ सामन्यांचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नाही. यापूर्वी, हैदराबाद आणि कोलकाता येथे २-२ प्लेऑफ सामने खेळवले जाणार होते.

आयपीएल २०२५ अंतर्गत ७४ सामने खेळवले जाणार होते. ७ मे पर्यंत ५७ सामने खेळले गेले होते, ८ मे रोजी ५८ वा सामना मध्येच थांबवावा लागला. म्हणजे आता १७ सामने शिल्लक आहेत. यापैकी १३ सामने लीग टप्प्यातील आहेत आणि ४ सामने प्लेऑफ टप्प्यातील आहेत.

मुंबई, कोलकाता, राजस्थान आणि चेन्नई यांचे प्रत्येकी दोन लीग सामने शिल्लक आहेत. उर्वरित संघांनी अद्याप प्रत्येकी तीन लीग सामने खेळलेले नाहीत. खाली दिलेल्या पॉइंट्स टेबलवरून संघांची स्थिती समजू शकते. एका संघाला १४ लीग सामने खेळावे लागतात.

आयपीएलच्या १० पैकी तीन संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. हैदराबाद, राजस्थान आणि चेन्नई हे तीन संघ स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. उर्वरित संघ अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहेत.

जेव्हा बीसीसीआयने लीग स्थगित करण्याचा निर्णय घेतला तेव्हा परदेशी खेळाडू आणि सपोर्ट स्टाफना त्यांच्या देशात परतण्यास सांगण्यात आले. यातील बरेच खेळाडू त्यांच्या घरी परतले आहेत. त्यांना पुन्हा बोलावले जाईल. तथापि, काही ऑस्ट्रेलियन खेळाडू वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल लक्षात घेऊन भारतात येण्यास नकार देऊ शकतात.

दरवर्षी आयपीएलसाठी एप्रिल-मे ही विंडो उपलब्ध असते. याचा अर्थ असा की या काळात जगात कुठेही कोणतीही मोठी मालिका होत नाही. जर जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत उर्वरित आयपीएल सामने झाले नाहीत तर बोर्डाला सप्टेंबरपर्यंत वाट पहावी लागेल.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना ११ जूनपासून ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला जाणार आहे. यानंतर, भारतीय संघाला इंग्लंडचा दौरा करायचा आहे, जिथे २० जूनपासून ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू होईल. उर्वरित संघ देखील ऑगस्टपर्यंत वेगवेगळ्या मालिकांमध्ये व्यस्त असतील. म्हणूनच बीसीसीआयने मे महिन्यातच आयपीएल संपवण्याची योजना आखली.

# मुंबई इंडियन्स २ सामन्यांमध्ये दिल्ली आणि पंजाब विरुद्ध भिडणार

**नवी दिल्ली, दि. १३ :**



भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धविराम जाहीर झाल्यानंतर आता सर्व गोष्टी पूर्वपदावर येत आहेत. दोन्ही देशांमधील तणावामुळे अनेक स्पर्धा स्थगित करण्यात आल्या होत्या. याचा परिणाम क्रिकेट स्पर्धांवर झाला होता. मात्र आता सर्व सुरळीत झाल्यानंतर या स्पर्धेचं पुन्हा आयोजन केलं जाणार आहे. बीसीसीआयने १२ मे रोजी आयपीएलच्या १८ व्या मोसमातील उर्वरित सामन्यांचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं. बीसीसीआयने १७ सामन्यांचं वेळापत्रक जाहीर केलं. यामध्ये प्लेऑफमधील ४ सामन्यांचा समावेश आहे. त्यानुसार १७ ते २७ मे दरम्यान साखळी फेरीतील सामने खेळवण्यात येतील. तर २९ मे ते ३ जून दरम्यान प्लेऑफचा थरार रंगणार आहे.

**पलटणची आयपील २०२५ मधील कामगिरी**

मुंबई इंडियन्सने या मोसमात आतापर्यंत एकूण १२ सामने खेळले आहेत. मुंबईने १२ पैकी ७ सामन्यांमध्ये विजय मिळवला. मुंबईची या मोसमात निराशाजनक सुरुवात झाली होती. मुंबईला पहिल्या ५ पैकी ४ सामन्यात पराभवाचं तोंड पाहावं लागलं. मात्र त्यानंतर मुंबईने जोरदार कमबॅक केलं. मुंबईने सलग ६ सामने जिंकत प्लेऑफचा दावा मजबूत केला. मात्र गुजरातने मुंबईचा विजय रथ रोखला. मुंबईने गुजरातला १५६ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र पावसाने २ वेळा खोडा घातल्याने गुजरातला १९ ओव्हरमध्ये १४% धावांचं सुधारित आव्हान मिळालं होतं. मुंबईने या धावांचा शेवटच्या ओव्हरपर्यंत बचाव केला. मात्र गुजरातने शेवटच्या बॉलवर विजय मिळवत मुंबई इंडियन्स टीमवर मात केली.

मुंबई इंडियन्सचे या १८ व्या मोसमातील २ सामने शेष आहेत. मुंबई या मोसमातील उर्वरित २ सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिट्ल्स आणि पंजाब किंग्स विरुद्ध भिडणार आहे. मुंबई दिल्ली विरुद्ध वानखेडे स्टेडियममध्ये भिडणार आहे. तर पलटण साखळी फेरीतील शेवटचा सामना हा पंजाब विरुद्ध जयपूरमधील सवाई मानसिंह स्टेडियममध्ये खेळणार आहे.

मुंबई इंडियन्ससाठी दोन्ही सामने हे अटीतटीचे आणि 'करो या मरो' असे आहेत. कारण दिल्ली आणि पंजाब हे दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीत आहेत. तसेच अद्याप एकही संघ प्लेऑफसाठी क्वालिफाय झालेला नाही. त्यामुळे इथून एकही चूक प्लेऑफचमध्ये पोहचण्याचं स्वप्न भंग करु शकते. अशात पलटणला या सामन्यात दमदार कामगिरी करण्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे पलटणच्या कामगिरीकडे चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

**मुंबईचे २ सामने**

**मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिट्ल्स, २१ मे**
**मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्स, २६ मे**

# स्मृती मंधानाचं रेकॉर्डब्रेक शतक

**कोलंबो, दि. १३ :**



वूमन्स टीम इंडियाची उपकर्णधार सांगलीकर स्मृती मंधाना हीने वनडे ट्राय सीरिज फायनलमध्ये श्रीलंकेविरुद्ध इतिहास घडवला आहे. स्मृतीने झंझावाती शतकी खेळी केली आहे. स्मृतीने कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये चौफेर फटकेबाजी करत हे शतक झळकावलं. स्मृतीच्या एकदिवसीय कारकीर्दीतील हे ११ वे शतक ठरले. स्मृतीने यासह कीर्तीमान केला आहे. स्मृती या ११ व्या शतकासह क्रिकेट विश्वात अशी कामगिरी करणारी पहिली भारतीय तर एकूण तिसरी महिला फलंदाज ठरली.

स्मृतीने श्रीलंकेविरुद्ध संयमी सुरुवात केली. त्यानंतर स्मृतीने गिअर बदलला आणि फटकेबाजीला सुरुवात केली. स्मृतीने १०१ बॉलमध्ये ११६ रन्स केल्या. स्मृतीने ११४.८५ च्या स्ट्राईक रेटने या धावा केल्या. स्मृतीच्या या खेळीत १५ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. स्मृतीने ९२ चेंडूत शतक पूर्ण केले. स्मृतीने यासह ११ व्या एकदिवसीय शतकासह खास विक्रम आपल्या नावावर केला. स्मृतीने टीम इंडियासाठी सर्वाधिक शतकांचा विक्रम आणखी भक्कम केला. तसेच स्मृती एकदिवसीय क्रिकेटमध्ये ११ शतक करणारी तिसरी महिला क्रिकेटर ठरली.

स्मृतीआधी ऑस्ट्रेलियाची मेग लॅनिंग आणि न्यूझीलंडची सुजी बेट्स या दोघींनी अशी कामगिरी केलीय. मेग लॅनिंग हीने १५ तर सुजी बेट्स हीने १३ शतके झळकावली आहेत. तर स्मृती मंधाना हीने इंग्लंडच्या टॅमी ब्यूमोंट हीला मागे टाकत तिसरं स्थान पटकावलं आहे.

दरम्यान स्मृतीने या ट्राय सीरिजमध्ये जबरदस्त कामगिरी केलीय. स्मतीने या मालिकेत टीम इंडियासाठी सर्वाधिक धावा केल्या आहेत. स्मृतीने ५ सामन्यांमध्ये ५२.८० च्या स्ट्राईक रेटने २६४ धावा केल्या आहेत. स्मृतीच्या या खेळीत १ शतक आणि १ अर्धशतकाचा समावेश आहे. स्मृतीने गेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अर्धशतक लगावले होते.

दरम्यान स्मृतीने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर टीम इंडियाने ३०० पार मजल मारली आहे. टीम इंडियाने ५० ओव्हरमध्ये % विकेट्स गमावून ३४२ धावा केल्या आहेत. भारतासाठी स्मृती व्यतिरिक्त हर्लीन देओल, कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमीमाह रॉड्रिग्स या तिघींनी ४० पेक्षा अधिक धावा केल्या. हर्लिनने ४%,जेमीमाह ४४ आणि हरमनप्रीतने ४१ धावांचं योगदान दिलं. प्रतिका रावलने ३० रन्स केल्या. अमनज्योत कौर हीने १८ धावांचं योगदान दिलं. तर दीप्त शर्माने नाबाद २० रन्स केल्या. त्यामुळे आता महिला ब्रिगेड श्रीलंकेला किती धावांवर रोखण्यात यशस्वी होते? याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष लागून आहे.

# वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी ऑस्ट्रेलियन संघाची घोषणा

**ग्रीन परतला, लॉर्ड्सवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना**

**नवी दिल्ली, दि. १३ :**



क्रिकेट ऑस्ट्रेलिया (सीए) ने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी ऑस्ट्रेलिया संघाची घोषणा केली आहे. संघ ११ ते १५ जून दरम्यान इंग्लंडमधील लॉर्ड्सच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना खेळेल.

अष्टपैलू कॅमरुन ग्रीन संघात परतला आहे. ग्रीनने पाठीच्या दुखापतीपूर्वी मार्च २०२४ मध्ये शेवटचा कसोटी सामना खेळला होता. वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स १५ सदस्यीय संघाचे नेतृत्व करेल. ऑस्ट्रेलियन संघ थढउ च्या तिसऱ्या अंतिम फेरीत आपले विजेतेपद राखेल.

बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताविरुद्ध पदार्पण करणाऱ्या युवा सॅम कॉन्स्टास्कलाही अंतिम संघात स्थान मिळाले आहे. याशिवाय, ब्रेंडन डॉगेटला प्रवासी राखीव खेळाडू म्हणून संघात स्थान मिळाले आहे. शेफील्ड शिल्डच्या अंतिम सामन्यात ब्रेंडन सामनावीर होता.

कर्णधार पॅट कमिन्स आणि सहकारी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड हे देखील कसोटी संघात परतत आहेत. दुखापतीमुळे दोन्ही खेळाडू चॅम्पियन्स ट्रॉफीला मुकले आणि नंतर आयपीएल २०२५ मध्ये पुनरागमन केले. तथापि, खांद्याच्या दुखापतीमुळे हेझलवूड त्याच्या फ्रँचायझी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी शेवटचा सामना खेळू शकला नाही. नंतर भारत-पाकिस्तान तणावामुळे लीग स्थगित करण्यात आली. आता त्याला पुढच्या सामन्यात खेळणे कठीण आहे.

वर्ल्ड कप आणि वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघ

पॅट कमिन्स (कर्णधार), ट्रॅव्हिस हेड, उस्मान ख्वाजा, सॅम कॉन्स्टास, मार्नस लाबुशेन, स्टीव्ह स्मिथ, ॲलेक्स केरी (यष्टीरक्षक), कॅमेरून ग्रीन, जोश इंगलिस, मिचेल स्टार्क, ब्यू वेबस्टर, जोश हेझलवूड, मॅट कुहनेमन, नॅथन लायन आणि स्कॉट बोलँड.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यानंतर ऑस्ट्रेलियन संघाला वेस्ट इंडिजचा दौरा करायचा आहे, त्यासाठी त्यांच्याकडे समान संघ असेल. ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडिज दौरा २५ जूनपासून सुरू होईल ज्यामध्ये प्रथम तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. यानंतर, दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका देखील होईल.

# अटल आसरा योजना योजनेअंतर्गत शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

*टीम दैनिक हेराल्ड*

**अगोंद, दि.१३ :** काणकोण येथील श्रीस्थळ ग्रामपंचायत सभागृहात अटल आसरा योजना योजनेअंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी आयोजित विशेष शिबिराचे उद्‌घाटन सभापती आणि काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांनी केले.

यावेळी समाज कल्याण मंत्री श्री. सुभाष फळ देसाई, उपजिल्हाधिकारी काणकोण, मामलेदार, सरपंच, पंच सदस्य आणि इतर मान्यवरांच्या उपस्थिती होती.

या शिबिराला लाभार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला, ज्यातून वेळेवर कल्याणकारी वितरणाची तीव्र गरज आणि परिणाम दिसून आला.



**श्रीस्थळ : शिबिराचे उद्‌घाटन करताना सभापती आणि काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर. बाजूला मान्यवर.**

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 251 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .